रविवार दि. २८ जुन २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २९७ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886




https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# नीट नंतर आता टीईटीचा धक्का...

## परीक्षा व्यवस्थेवर पुन्हा प्रश्नचिन्ह; टीईटी परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय

**पुणे/मुंबई -प्रतिनिधी**

काही दिवसांपूर्वी परीक्षेतील कथित पेपरफुटीच्या प्रकरणाने संपूर्ण देश हादरला असतानाच आता शिक्षक पात्रता परीक्षा (नीट प्रकरणानंतर आणखी एक धक्का; भिवंडीत संशयितांकडून प्रश्नपत्रिकेतील प्रश्न आढळल्याने गुन्हा दाखल ) २०२६ च्या प्रश्नपत्रिकेतील काही प्रश्न बाहेर आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या घटनेमुळे पुन्हा एकदा महाराष्ट्रातील परीक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून लाखो परीक्षार्थींच्या भवितव्याबाबत चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत रविवार, दि. २८ जून २०२६ रोजी राज्यभरातील एकूण १,०२८ परीक्षा केंद्रांवर शिक्षक पात्रता परीक्षा () घेण्यात येणार होती. या परीक्षेसाठी राज्यभरातून लाखो उमेदवारांनी अर्ज केले होते.

२०२६ परीक्षेतील गैरप्रकार लक्षात घेऊन महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने यावेळी प्रश्नपत्रिकेच्या सुरक्षिततेसाठी विशेष उपाययोजना केल्या होत्या. प्रश्नपत्रिकांची वाहतूक, साठवणूक तसेच वितरण प्रक्रियेत अत्यंत गोपनीयता राखण्यात आल्याचा दावा परीक्षा परिषदेने केला होता. मात्र, या सर्व उपाययोजनांनंतरही प्रश्नपत्रिकेतील काही प्रश्न बाहेर आल्याचा प्रकार समोर आल्याने प्रशासनात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, ठाणे जिल्ह्यातील भिवंडी परिसरात काही व्यक्तींना शिक्षक पात्रता परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेबाबत आधीच माहिती मिळाल्याची माहिती पोलिसांना प्राप्त झाली होती. या माहितीच्या आधारे भिवंडी पोलिसांनी शनिवारी पहाटे संबंधित ठिकाणी धाड टाकली.

या कारवाईनंतर महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या अधिकाऱ्यांना तातडीने घटनास्थळी बोलावण्यात आले. संशयितांकडे आढळून आलेल्या माहितीची पडताळणी करण्यात आली असता, त्यांच्या ताब्यात असलेल्या काही प्रश्नांचा आणि जून २०२६ च्या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांचा मेळ आढळल्याचे समोर आले.

या प्रकरणी भिवंडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू करण्यात आला आहे.

संपूर्ण प्रकरणाची गंभीरता लक्षात घेऊन महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने २८ जून रोजी होणारी शिक्षक पात्रता परीक्षा पुढे ढकलण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

परीक्षा कोणत्याही परिस्थितीत पूर्ण पारदर्शक आणि निष्पक्ष वातावरणातच घेण्यात यावी, हा परीक्षा परिषदेचा आग्रह असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच या प्रकरणाची सखोल चौकशी होणे आवश्यक असल्याने परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे परिषदेने सांगितले.परीक्षा पुढे ढकलल्याच्या निर्णयामुळे राज्यभरातील लाखो उमेदवारांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक उमेदवार परीक्षा केंद्रांवर जाण्यासाठी प्रवासाची तसेच निवासाची व्यवस्था करून बसले होते. काही उमेदवारांनी नोकरीच्या आशेने अनेक महिन्यांपासून या परीक्षेची तयारी केली होती.

वारंवार होणाऱ्या पेपरफुटीच्या घटनांमुळे विद्यार्थी आणि स्पर्धा परीक्षा उमेदवारांमध्ये संताप व्यक्त केला जात असून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने उमेदवारांना घाबरून न जाण्याचे आवाहन केले आहे. शिक्षक पात्रता परीक्षा () संदर्भातील अद्ययावत माहिती परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.दरम्यान, नंतर आता परीक्षेतील कथित पेपरफुटीमुळे राज्यातील परीक्षा व्यवस्थेच्या विश्वासार्हतेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून या प्रकरणातील मुख्य सूत्रधारांपर्यंत पोहोचून कठोर कारवाई करण्याची मागणी सर्व स्तरांतून होत आहे.

**सदर प्रकरणी तिघांवरती गुन्हा दाखल आहे पुढील तपास पोलीस करत आहेत. चौकशी अंतिम निष्पन्न होईल त्याच्यावर कारवाई केली जाईल. अशा प्रकारची परीक्षा घेण्यासाठी तीन आठवड्यांची प्रक्रिया असते, असं प्रिया शिंदे म्हणाल्या. तसेच महाराष्ट्रातील ६ लाख १२८ शिक्षकांना पुन्हा नोंदणी करण्याची गरज नाही. ६ लाख १२६ परिक्षार्थी कडून अतिरिक्त शुल्क आकारले जाणार नाही. येत्या २ ते ३ दिवसांनी टीईटी परीक्षेची नवीन तारीख घोषित केली जाईल, अशी माहिती प्रिया शिंदे यांनी दिली. तसेच ३७ शहरातील १०२८ परिक्षा केंद्रावर पुन्हा नव्याने परिक्षा घेतली जाणार आहे, असंही प्रिया शिंदे यांनी सांगितले.**

## रेल्वे स्टेशन परिसरात मोटारसायकल घेऊन येणाऱ्या प्रवाशांवर होणार कारवाई

**परतूर - प्रतिनिधी**

परतूर रेल्वे स्टेशन परिसरात मोटारसायकल घेऊन येणाऱ्या प्रवाशांवर आता थेट कारवाई होणार आहे. रेल्वे सुरक्षा दलाचे (आरपीएफ) अधिकारी विजय वाघ यांनी आज स्पष्ट शब्दांत इशारा दिला आहे. रेल्वे स्टेशन हा सार्वजनिक ठिकाण असून प्रवाशांच्या सुरक्षेसाठी आहे. प्लॅटफॉर्मवर किंवा स्टेशन परिसरात विनापरवाना मोटारसायकल आणणे हा नियमभंग आहे. गर्दीच्या वेळी अपघाताचा धोका वाढतो आणि इतर प्रवाशांना अडथळा निर्माण होतो. त्यामुळे यापुढे मोटारसायकल आणल्यास दंडात्मक व कायदेशीर



कार्यवाहीला सामोरे जावे लागेल,असे विजय वाघ यांनी स्पष्टपणे सांगितले.या परिसरात ज्येष्ठ नागरिक, महिला व लहान मुलांना चालण्यास अडचण निर्माण आहे.व रेल्वे मालमत्तेचे नुकसान होण्याच्या घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

याप्रमाणे कारवाई होणार,

**पहिल्यांदा सूचना व समज देण्यात येईल. नियम**

तोडल्यास रेल्वे कायद्यान्वये दंड आकारला जाईल.वारंवार गुन्हा केल्यास मोटारसायकल जप्त करून,१४७,१५४,१५३, या कलमानुसार कायदेशीर कारवाई दोन वर्ष किंव्हा दोन हजार रुपये दंड होऊ शकतो. आर.पी.एफ.ने प्रवाशांना आवाहन केले आहे की, रेल्वे स्टेशनपासून १०० मीटर अंतरावर असलेल्या पार्किंग मधेच आपली वाहने पार्क करावी. रेल्वे प्रशासनाने दुचाकींसाठी स्वतंत्र पार्किंगची व्यवस्था केली असून तिचाच वापर करावा.प्रवाशांची सुरक्षा हीच आमची प्राथमिकता आहे.

परतूर रेल्वे स्टेशन येथे आर. पी.एफ.कडून जनजागृती मोहीमही राबवली जात आहे. यावेळी लोहमार्ग पोलिस हवालदार कैलास वाघ, कॉन्स्टेबल कृष्णा खरात,आरपीएफच्या महिला कॉन्स्टेबल गुड्डी कुमारी मीना, तसेच पत्रकार शिवकुमार भारुका, ऑटो रिक्षावाले व काही पॅसेंजर ची उपस्थिती होती.

## भोकरदनच्या इतिहासात पहिल्यांदा - गुत्तेदारांना सार्वजनीक बांधकाम विभागाची नोटीस - बोरशे गुरुजीं

**दत्ता देशमुख**

आमदार-खासदार जवळच्या राजुरेश्वर व करेज कंपनीला लेखी दणका - उपोषणामुळे सा. बां. विभाग झुकला करजगांव, भोकरदन: भोकरदन तालुक्यात गेल्या अनेक वर्षांपासून सत्ताधारी पुढाऱ्यांच्या पाठबळावर असलेल्या काही प्रतिष्ठित गुत्तेदार कंपन्या आहेत. राजुरेश्वर इंफ्रास्ट्रक्चर असो किंवा करेज इंफ्रा. असो, या आमदार-खासदार जवळच्या कंपन्यांच तालुक्यातील कामे करतात.अर्धवट सोडतात. रस्त्याच्या कामावर कोणी बोट ठेवायची हिंमत करत नव्हता.

काम न करता देखील



लाखो रुपये उचलले जात होते. सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी देखील त्यांच्यासमोर हात जोडून उभे राहत होते. आताही ही कामे अर्धवट सोडण्याचा डाव बोरशे गुरुजींच्या उपोषणामुळे फसला.

बोरशे गुरुजींनी दि. ०१/०७/२०२६ पासून आमरण उपोषणाचा इशारा दिला होता.परिणाम तात्काळ झाला. भोकरदनच्या इतिहासात पहिल्यांदाच सार्वजनिक बांधकाम विभागाला या सत्ताधारी कंपन्यांना लेखी नोटीस काढावी लागली.

उपविभागीय अभियंता यांनी राजुरेश्वर इंफ्रास्ट्रक्चर असो किंवा करेज इंफ्रा. या दोन्ही कंपन्यांना अंदाजपत्रकीय तरतुदीप्रमाणे उर्वरित कामे तात्काळ पूर्ण करा अशी लेखी नोटीस बजावली.

दि. २६/०६/२०२६ रोजी दुपारी २ वाजता उपविभागीय अभियंता हे बोरशे गुरुजींसह सुरंगळी ते जळगाव सपकाळ व करजगाव ते कल्याणी-कुकडी या दोन्ही रस्त्यांची *(पान २ वर)*




## छत्रपती शाहू महाराज यांनी बहुजनांचा उद्धार केला- प्रा. सुनिल बनसोडे

**दत्ता देशमुख**

श्रीमती.जे. बी. के. विद्यालय व नवभारत उच्च माध्यमिक विद्यालयात राजर्षी शाहु महाराज यांच्या जयंती निमित्त आयोजीत कार्यक्रमात प्रा. सुनिल बनसोडे यांनी छत्रपती शाहू महाराज यांनी परंपरेची चौकट मोडुन बहुजनांचा उद्धार केला असे गौरवोद्गार काढले. सुरूवातीला प्रतिमा पुजन करून, छत्रपती शाहू महाराज यांना विनम्र अभिवादन



करण्यात आले.

कार्यक्र माच्या अध्यक्षस्थानी प्रा. सुनील बनसोडे हे होते, तर आर.टी. इंगळे व पर्यवेक्षक बी.यु. ससाने यांची प्रमुख उपस्थिती होती. शाहू महाराजांच्या जीवन कार्याविषयी बोलत असतांना राजर्षी शाहू महाराजांनी बहुजनांच्या, शेतकऱ्यांच्या, कष्टकऱ्यांच्या, पद- दलितांच्या जीवनाचा *(पान २ वर)*

## पल्स पोलिओ मोहिमेत आज आपल्या बालकांचे लसीकरण करुन घ्यावे - जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

**जालना - प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यात आज राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिम राबविण्यांत येणारं आहे. पल्स पोलिओ मोहिम अंतर्गत जालना जिल्ह्यातील ० ते ५ वयोगटातील २ लक्ष ५६ हजार ८७५ बालकांना पोलिओची मात्रा देण्याचे उद्दिष्ट असुन ० ते ५ वर्षे वयोगटातील सर्व बालकांना पल्स पोलिओ लसीकरण करून घेण्याचे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले आहे. पल्स पोलिओ मोहिमेसाठी सुक्ष्मकृती आराखडा तयार करुन त्याप्रमाणे नियोजन केले आहे. ग्रामीण, शहरी भागामध्ये पल्स पोलिओ बुथचे आयोजन करुन कर्मचारी, पर्यवेक्षक यांची डयुटी लावण्यांत आलेली आहे. जिल्हयामध्ये पल्स पोलिओ मोहिम यशस्वी होण्यासाठी एकुण ५ हजार ५४७ मनुष्यबळाचा वापर करण्यांत येणार आहे. अंगणवाडी, उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, शहरी नागरी आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, जिल्हा स्त्री रुग्णालय, जिल्हा रुग्णालय, रेल्वे स्टेशन, बस स्टँण्ड व काही खाजगी रुग्णालय येथील पोलिओ बुथवर ० ते ५ वर्षे वयोगटातील बालकांना पोलिओची लस सकाळी ८.०० ते सांयकाळी ५.०० वाजेपर्यंत देण्यांत येईल.

### आ. अर्जुनराव खोतकर यांच्या पाठपुराव्याला यश; नागरिकाकडुन सत्कार

## जालना शहरासह ग्रामीण भागातील वीजपुरवठा सुरळीत

**जालना- प्रतिनिधी**

जालना, दि. जालना शहरासह ग्रामीण भागात गेल्या काही दिवसांपासून वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे नागरिक, शेतकरी, व्यापारी आणि उद्योग क्षेत्र मोठ्या अडचणीत सापडले होते. या गंभीर प्रश्नाची दखल घेत आमदार अर्जुनराव खोतकर यांनी राज्य विधिमंडळाच्या अधिवेशनात हा विषय प्रभावीपणे मांडून शासनाचे लक्ष वेधले. व त्यानंतर आमदार खोतकर यांनी जालना येथे



महावितरणच्या वरिष्ठ व कनिष्ठ अधिकाऱ्यांची तातडीची बैठक घेऊन वीजपुरवठा सुरळीत करण्याबाबत कठोर सूचना दिल्या. बैठकीत शहर व ग्रामीण भागातील विविध तांत्रिक अडचणींचा आढावा घेण्यात आला आणि तातडीने उपाययोजना राबविण्याचे निर्देश देण्यात आले.

महावितरण प्रशासनाने त्वरित कार्यवाही करत वीजपुरवठा पूर्ववत व सुरळीत करण्यासाठी प्रभावी उपाययोजना केल्या. त्यामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून यामुळे आमदार अर्जुनराव खोतकर यांची भेट घेऊन पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी सगीरभाई अहमद, वसंतराजे जाधव, शिवाजीराव शेळके, योगेश चिरखे, शिवाजीराव नागवे गणेशराव घुले भागवत घुले यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी आमदार अर्जुनराव खोतकर यांनी सांगितले की, ‘‘जालना शहर व ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आणि अखंडित वीजपुरवठा मिळणे ही महावितरणची जबाबदारी आहे. भविष्यात अशा प्रकारच्या समस्या निर्माण होऊ नयेत यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना तातडीने राबविण्यात याव्यात. नागरिकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही यासाठी सातत्याने पाठपुरावा केला जाईल.‘‘ जालना शहरासह ग्रामीण भागातील वीजपुरवठा अधिक सक्षम, स्थिर आणि सुरळीत करण्यासाठी आवश्यक सर्व सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाहीही यावेळी देण्यात आली.

# संपादकीय....

## अवैध धंद्यांविरोधातील कारवाई पुरेशी की केवळ आकड्यांचा खेळ?

जालना जिल्ह्यात अवैध धंद्यांविरोधात गेल्या एका महिन्यात ४७० कारवाया करून तब्बल १०.२६ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आल्याची आकडेवारी समोर आली आहे. पहिल्या नजरेत ही कारवाई प्रभावी आणि समाधानकारक वाटते. मात्र या आकडेवारीकडे केवळ यश म्हणून पाहण्याऐवजी त्यामागील वास्तवाचा विचार करणे तितकेच आवश्यक आहे. एका महिन्यात ४७० कारवाया होणे ही बाब दोन गोष्टी स्पष्ट करते. पहिली म्हणजे पोलीस व संबंधित यंत्रणा अवैध धंद्यांविरोधात सक्रिय झाल्या आहेत. परंतु दुसरी आणि अधिक गंभीर बाब म्हणजे जिल्ह्यात एवढ्या मोठ्या प्रमाणावर अवैध धंदे सुरू होते किंवा अजूनही सुरू आहेत. ही परिस्थिती चिंताजनक आहे.

दारूबंदी कायद्यांतर्गत २५३ गुन्हे दाखल होणे हे जिल्ह्यातील अवैध दारू व्यवसायाचे मोठे जाळे दर्शवते. ग्रामीण भागापासून शहरापर्यंत हातभट्टी, अवैध दारू विक्री आणि वाहतूक सुरू असल्याचे हे संकेत आहेत. अनेक वेळा अशा कारवाया होतात, मात्र काही दिवसांनंतर त्याच ठिकाणी पुन्हा व्यवसाय सुरू झाल्याचे दिसून येते. त्यामुळे केवळ धाडी टाकून प्रश्न सुटणार नाही. वाळू तस्करीच्या कारवायांमध्ये तब्बल ८.८१ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त झाल्याची नोंद अधिक गंभीर आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उपसा आणि वाहतूक सुरू असेल तर त्यामागे केवळ काही वाहनचालक किंवा मजूर नसून एक मोठी साखळी कार्यरत असल्याची शक्यता नाकारता येत नाही. नदीपात्रांचे होणारे नुकसान, पर्यावरणीय हानी आणि महसूलाचे नुकसान याकडेही दुर्लक्ष करता येणार नाही. गुटखा, अमली पदार्थ आणि जुगारावरील कारवायाही चिंताजनक चित्र उभे करतात. युवकांमध्ये वाढणारे व्यसन, ग्रामीण भागातील जुगार अड्डे आणि प्रतिबंधित पदार्थांची सहज उपलब्धता हे सामाजिक आरोग्यासाठी धोक्याचे संकेत आहेत. विशेषतः अमली पदार्थांच्या वाढत्या प्रकरणांकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. या सर्व कारवायांमुळे एक प्रश्न उपस्थित होतो कारवाईनंतर पुढे काय? अनेक प्रकरणांमध्ये आरोपी जामिनावर बाहेर येतात आणि पुन्हा त्याच व्यवसायात सक्रिय होतात. त्यामुळे केवळ गुन्हे दाखल करून किंवा मुद्देमाल जप्त करून अवैध धंद्यांवर कायमस्वरूपी नियंत्रण मिळवणे कठीण आहे.

यासाठी प्रतिबंधात्मक उपाय, स्थानिक माहिती यंत्रणा मजबूत करणे, आर्थिक साखळी मोडीत काढणे आणि सराईत गुन्हेगारांवर कठोर कायदेशीर कारवाई करणे आवश्यक आहे. समाजातील नागरिकांनीही पोलिसांना माहिती देण्याची भूमिका बजावली पाहिजे.

जालना जिल्ह्यातील ही आकडेवारी प्रशासनासाठी एका बाजूने यशाची असली तरी दुसऱ्या बाजूने ती समाजासमोर गंभीर प्रश्नही उपस्थित करते. अवैध धंद्यांवर अंकुश आणण्यासाठी सातत्यपूर्ण कारवाई, प्रभावी न्यायिक प्रक्रिया आणि सामाजिक जनजागृती यांची सांगड घालणे आजची गरज आहे.

कारण केवळ आकडे वाढणे हे यशाचे मोजमाप नसते; तर त्या कारवायांमुळे गुन्हेगारीत प्रत्यक्ष घट होते का, हेच खरे यश ठरते.

# निराश करणारा निकाल न्यायदेवतीची शोकांतिका..?

....वीस वर्षे तब्बल दोन दशके. एका लोकनेत्याच्या आणि त्याच्या वाहन चालकाच्या हत्येचा खटला चालला आणि शेवटी २० जून २०२६ रोजी मुंबईच्या विशेष सीबीआय न्यायालयाने माजी गृहमंत्री पद्मसिंह पाटील यांच्यासह नऊच्या नऊ आरोपींना निर्दोष सोडले. न्यायालयाचा निर्णय न्यायालयासमोर आलेल्या साक्षीपुराव्यांच्या आधारे कायद्याच्या चौकटीत असल्याने त्याविषयी दुमत असण्याचे कारण नाही. न्यायव्यवस्थेवर येथील जनतेचा विश्वास असतो आणि आहे. परंतु न्यायालयासमोर न्यायालयासमोर प्रकरण कसे यायला हवें, हे सर्वस्वी तपास यंत्रणांवर अवलंबून असते. जर तपास यंत्रणा सत्तेच्या बरहुकूम काम करत असतील तर न्याय मिळवणे कठीण असते, सामान्यांचा हा घातक समज आणखी मजबूत होणे निराश करणारे आहे. पवनराजे निंबाळकर यांची ३ जून २००६ रोजी कळंबोलीत झालेल्या गोळीबारात हत्या झाली होती. पवनराजे निंबाळकर आणि समद काझी यांच्यावर गोळ्या झाडल्या गेल्या. दोघे जागीच ठार झाले. तेव्हापासून त्यांचा मुलगा, धाराशिवचे विद्यमान सदार ओमराजे निंबाळकर न्यायासाठी लढत होते. वीस वर्षे त्यांनी कोर्टाच्या पायऱ्या झिजवल्या. निकालाच्या दिवशीही ते कोर्टात हजर होते. न्यायाधीश एस.आर. नावंदर यांनी स्वतः निकालाबाबत खंत व्यक्त केली. ही खंत येथील न्यायव्यवस्थेला जबाबदार असलेल्या तपास यंत्रणांना दबावात घेणाऱ्या सत्तेविषयी असल्याचे स्पष्ट व्हावे. न्यायालय वस्तुनिष्ठ पुराव्यांनुसार निर्णय देते, न्यायालयासमोर येणाऱ्या प्रकरणांविषयी न्यायाधीशांचे व्यक्तीशः मत काय काय आहे, हा प्रश्न यायालयीन प्रक्रियेचा भाग नसतो.

या प्रकरणाविषयी निकाल देताना न्यायालयाने केलेली टिपण्णी महत्वाची आहे. लोकनेत्याची हत्या होणे दुर्दैवी आहे. निकालाला २० वर्षे लागल्याबद्दल तीव्र खंत आहे, असे न्यायाधीश म्हणाले. उशिरा मिळालेला न्याय हा न्याय नाकारल्यासारखाच असतो, अशा आशयाची इंग्रजी म्हण आहे. न्यायालयाने व्यक्त केलेली खंत न्यायव्यवस्थेच्या मर्यादा स्पष्ट करणारी आहे. या निकालात सर्वच आरोपी निर्दोश सुटले, मग खरे दोषी कोण ? हत्येची घटना झालीच नाही का? जर हत्या झाली तर ती करणारेही असतीलच की? मग निर्दोष कोण सुटले? खरे मारेकरी तपास यंत्रणांनी पकडलेच नाहीत का? जर पकडले असतील तर त्यांना कायद्यानुसार शिक्षा का झाली नाही? निकाल येण्यासाठी २० वर्षांचा कालावधी हा मोठा नव्हता का? या खटल्याच्या



तपासात जाणीवपूर्वक कच्चे दुवे ठेवले गेले का? हा खटला एका अतिमहत्वाच्या व्यक्तीच्या हत्येच्या तपासातील ढिसाळ कारभाराचा नमुना ठरावा. जर मोठ्या नेत्यांच्या हत्येनंतर असल अशी स्थिती असेल तर सर्वसामान्यांनी निष्पक्ष न्यायाची अपेक्षा कोणाकडून ठेवावी?

न्यायालयाने स्पष्टच सांगितले की, खटल्याचा पाया ठिसूळ होता. संपूर्ण खटला ज्या माफीचा साक्षीदार पारसमल जैन याच्यावर उभा होता, त्यानेच तीन वेळा आपली साक्ष बदलली. त्याने त्याच्यावर दबाव असल्याने साक्ष दिल्याचे सांगितले. असा जबाब कोर्ट कसा मान्य करणार? न्यायमूर्तींनी त्याला फितूर घोषित केले. याशिवाय सीबीआयने मोबाईल जप्त केले नाहीत, कॉल डिटेल्स गोळा केले नाहीत. एकविसाव्या एकविसाव्या शतकात, जिथे एका मिस्ड कॉलवरून माणूस सापडतो, तिथे हायप्रोफाइल हत्येच्या तपासात सीबीआयसारखी संस्था प्राथमिक पुरावेच गोळा करत नाही, हे अनाकलनीय आहे. पवनराजेंच्या पत्नी आनंदीदेवी यांची साक्षही न्यायालयाने अम् अमान्य केली. म्हणजे तपास करणारी सर्वोच्च अशी सीबीआय ही केंद्रीय यंत्रणा या ठिकाणी सपशेल अपयशी ठरली. या प्रकरणात गुन्हा आरोपींनी केला हे सिद्ध होत नाही, असे न्यायालय म्हणाले. आरोपींनी गुन्हा केला नाही असे न्यायालय म्हणत म्हणत नाही. कायद्याच्या भाषेत ते निर्दोष आहेत. पण जनतेच्या मनातला संशय? तो कायम आहे. आणि हाच आपल्या व्यवस्थेचा सर्वात मोठा पराभव आहे. न्यायव्यवस्थेची मानहानी म्हणजे काय? फक्त कोर्टावर शाई फेकणे किंवा न्यायव्यवस्थेविरोधात घोषणा देणे ही मानहानी नाही. जेव्हा वीस वर्षे खटला चालूनही सत्य बाहेर येत नाही.

तेव्हा मानहानी होते. पवनराजे निंबाळकर यांची हत्या झालीच नाही का? संतापाच्या भरात असे शब्द तोंडात येतात. पण सत्य हे आहे की हत्या झाली. दोन कुटुंबे उद्ध्वस्त झाली. एका जिल्ह्याने आपला नेता गमावला. फक्त मारेकरी कोण, हे व्यवस्थेला वीस वर्षांत शोधता आले नाही, ही शोकांतिका आहे. हेच या निकालाने पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

आपल्या देशात मोठ्या लोकांविरुद्धचे खटले कसे चालतात. वारंवार मिळणाऱ्या तारखा, पुरावे गोळा करण्यात दिरंगाई. साक्षीदार फोडणे किंवा त्यांच्यावर दबाव आणणे आणि शेवटी संशयाचा फायदा देऊन सुटका. या सगळ्यात सामान्य माणसाचा कायद्यावरचा, पोलिसांवरचा, सीबीआयवरचा आणि कोर्टावरचा विश्वास उडतो. हा उडालेला विश्वास खूपच निराश करणारा असतो. ज्यांच्याकडे पैसा आणि सत्ता आहे, त्यांना कायदा कसाही वाकवता येतो, हे वाक्य लोकशाहीसाठी घातक आहे. पवनराजे प्रकरण एकमेव नाही. असे शेकडो खटले वर्षानुवर्षे धूळ खात पडले आहेत. त्यातल्या आरोपींना शिक्षा होईल याची शाश्वती नाही, पण मृतांच्या कुटुंबीयांना शिक्षा मात्र रोज मिळते, दीर्घकाळ न्यायाची प्रतीक्षा केल्यावर पदरात असा निराश करणारा निकाल पडत असेल तर तो अन्यायापेक्षाही जास्त धक्कादायक असतो.

**ह.भ.प.शिवाजी विठ्ठल चौगुले.**
**मु.पो.मासा बेलेवाडी,**
**कागल-कोल्हापूर.**

# आता मोबाईल ठरतोय विद्यार्थ्यांसाठी घातक!

लहानपणी बाळ रडू लागले की, त्या बाळाची आई आपल्या बाळाच्या हातात मोबाईल देऊन त्याला रंजवण्याचा प्रयत्न करत असते. आणि खरोखरच त्या बाळाच्या हातात मोबाईल पडताच त्या मुलाचे रडगाणे आपोआप थांबते. सुरुवातीला बालवयात आईवडील आपल्या मुलाला कार्टून, विनोदी कथा, अंगाईगीत तसेच टिकटॉक, युट्युब आणि फेसबुक या लोकप्रिय माध्यमावरील मनोरंजक व्हिडिओ पाहण्यासाठी आईवडील आपल्या मुलांच्या हातात मोबाईल देऊन त्यांचे मनोरंजन करत असतात. बालवयात मुलांच्या हातात मोबाईल दिल्यामुळे जरी मुलांचे मनोरंजन होत असेल आणि मुलांचे रडगाणे थांबत असेल, म्हणून मुलांच्या हातात मोबाईल देणे हे काहींना योग्य वाटत असेल, पण बालवयात जर आपण मुलांच्या हातात मोबाईल देऊन त्यांचे मनोरंजन करण्याचा प्रयत्न करत असाल तर भविष्यात मोबाईल मुलांच्या जीवावर सुद्धा बेतू शकतो किंवा विनाशाचे कारण ठरू शकतो. कारण बालवयात मुलांना लागलेले कोणतेही व्यसन चिरकाळ टिकणारे असते. एकदा मुलांना मोबाईलचे व्यसन लागले, की मग ती मुले त्या व्यसनाचा कहरच करून टाकतात. त्यांना जराही मोबाईल शिवाय राहवत नाही आणि करमतही नाही. म्हणजे मोबाईल शिवाय राहणे त्यांना नको वाटते. मोबाईल विना जगणे त्यांना निरस वाटते.

चार माणसात बसले तरीही त्यांच्या हातात मोबाईल, जेवताना मोबाईल, झोपताना मोबाईल, एखाद्या कार्यक्रमात गेले तरी मोबाईल, गाडी चालवताना हातात मोबाईल, रस्त्याने चालताना मोबाईल म्हणजे उठता-बसता आजकाल मुलांना हातात मोबाईल राहावा वाटत आहे. इतके भयानक व्यसन आजकालच्या मुला-मुलींना लागले आहे. आणि हेच व्यसन आता मुलांच्या जीवनात अक्राळविक्राळ रूप धारण करत आहे. आम्हाला अजूनही मोबाईल नीट हाताळता येत नाही परंतु आताची मुले बालवयापासूनच मोबाईल हाताळण्यात पटाईत बनले आहेत. एकेकाळी आम्ही शाळेला जाताना हातात कंपास पेटी घेऊन जायचो परंतु आजकालची मुले-मुली शाळेला जाताना हातात कंपास पेटी घेऊन जाण्याऐवजी मोबाईल घेऊन जात आहेत. ही देशहितासाठी खरोखरच दुर्दैवाची बाब म्हणावी लागेल. खरे तर आई-वडिलांनी बालवयात आपल्या मुला-मुलींच्या हातात मोबाईल ऐवजी पाटी व पेन्सिल देऊन त्यांना शिक्षणाची गोडी लावायला हवी. त्यांना मोबाईल मधील घाणेरडे व्हिडिओ दाखवण्यापेक्षा प्रबोधनात्मक छान छान गोष्टी व संस्कार कथा देऊन त्यांना देशाचा सुसंस्कारी नागरिक घडवणे सध्या काळाची गरज आहे. असे मला वाटते. आजकालची मुले शैक्षणिक प्रवाहाच्या बाहेर पडण्याचे एकमेव कारण म्हणजे मोबाईल आहे. मुले मोबाईलच्या आहारी गेल्यामुळे मुलांना वाचन, लेखन आणि अध्ययन नको वाटत आहे. आम्ही शालेय जीवनात फावल्या वेळेत पुस्तकांचे वाचन व लेखन करायचो, गणिताची जटिल उदाहरणे सोडवायचो, महापुरुषांची पुस्तके वाचायचो, मैदानी खेळ खेळायचो, तेव्हा आम्ही सर्वजण एकत्र येऊन अभ्यास करायचो परंतु आज आमची मुले एकत्र येऊन फ्रीफायर आणि लुडो सारखे घातक गेम्स खेळत आहेत. आमच्या शालेय जीवनात आम्हाला साधा बटनाचा मोबाईल शाळेत घेऊन जायला अलाउड नव्हते. शाळेत मोबाईल घेऊन जायचा म्हटले तर आम्हाला शिक्षकांची खूप भीती वाटायची. परंतु आताची मुले मुली बिनधास्तपणे हातात स्मार्टफोन घेऊन शाळेत जात आहेत आणि कानाला हेडफोन लावून मनसोक्त गाणे ऐकत आहेत. एकेकाळी मुलांना प्रेम, लफडे, प्यार, इश्क मोहब्बत या गोष्टी कळायला खूप दिवस लागायचे. परंतु मोबाईलच्या जमान्यात अगदी पहिली व दुसरीच्या मुला-मुलींना सुद्धा या शब्दांचा अर्थ कळायला लागला आहे. कारण म्हणजे, त्याकाळी मुलामुलींच्या हातात मोबाईल नव्हता तर पुस्तक होते, परंतु आताच्या प्रत्येक मुला-मुलींकडे मोबाईल आहे, त्या मोबाईल मध्ये हवा तेवढा इंटरनेट डाटा असतो.

आमची मुले वाचन व लेखन करण्याऐवजी तासंतास मोबाईल मध्ये तोंड खुपसून आहेत. मोबाईल मध्ये नको तसले घाणेरडे व अश्लील व्हिडिओ बघत आहेत. कोणत्यातरी नट व नटीचे फॅन बनत आहेत. त्यांचे अनुकरण करून आपणही तसेच व्हिडिओ बनवत आहेत. आणि लगेच सोशल मीडियावर सोडत आहेत. आजकाल मुलांमध्ये एकापेक्षा एक भारी भारी व्हिडिओ बनवण्याची व लाईक मिळवण्याची जणू स्पर्धाच लागली आहे. आणि याच स्पर्धेमुळे मुलांमध्ये अभ्यासाची स्पर्धा कमी झाली आहे. इंस्टाग्राम, फेसबुक, ट्विटर आणि व्हाट्सअप या माध्यमांचा चांगला वापर करायचा सोडून, आमची युवापिढी म्हणजेच आताची मुले-मुली चॅटींगसाठी, नको तसले व्हिडिओ पाहण्यासाठी, मुला-मुलींना वश करण्यासाठी या माध्यमांचा वापर करत आहेत. या माध्यमांवर जास्तीत जास्त युवा पिढी सक्रिय राहुन नुसता प्रेमाचा बाजार मांडत आहे. हे खरोखरच या देशाचे दुर्दैव म्हणावे लागेल. मोबाईलमुळेच मुले-मुली बिघडत आहेत. हे कोणालाही नाकारता येणार नाही. प्रत्येक आईने आपल्या मुलांवर लहानपणीच सुसंस्काराची पेरणी करणे गरजेचे असते, परंतु आताच्या नव्या पिढीतील मॉम म्हणजेच आई आपल्या मुलांना बालवयात संस्काराचे धडे देण्याऐवजी त्यांच्या हातात मोबाईल देऊन मुलांना बिघडवत आहे.

हल्ली मुली पळून जाण्यास मोबाईल कारणीभूत ठरतो. मोबाईलच्या अति आहारी गेलेले बरेच तरुण-तरुणी मनोरुग्न होऊन आत्महत्या करत आहेत.

वडिलांनी मोबाईल घेऊन नाही दिला म्हणून बरेच तरुण-तरुणी स्वतःची जीवन यात्रा संपवत आहेत. आजकाल शाळेत व कॉलेजमध्ये जायचे झाले तर मोबाईल असणे हे प्रतिष्ठेचे लक्षण झाले आहे. परंतु आई-वडील बालवयापासूनच आपल्या मुलांना मोबाईलची सवय लावत आहेत. पुढे चालून तीच सवय त्या मुलांच्या जीवावर बेतत आहे, आणि अक्राळविक्राळ रूप धारण करून विद्यार्थ्यांचे वाटोळे करत आहे...मोबाईलचा वापर गरजेपुरताच आणि कामापुरताच करावा. त्यासाठी प्रत्येक पालकाला माझी विनंती आहे की, आपण आपल्या पाल्यांना बालवयात फक्त संस्काराचे धडे द्यावेत, त्यांना मोबाईलपासून चार हात लांब ठेवावे आणि त्यांच्या हातात मोबाईल देण्यापेक्षा पाटी व पेन्सिल देऊन त्यांना शिक्षणाची गोडी लावावी आणि भविष्यात येणाऱ्या आपत्तीपासून धोका होणार नाही याची खबरदारी घ्यावी.

**- बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

# नाणार - वाघोटण खाडीवर वाहतूक आवश्यक

रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यातील नाणार आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड तालुक्यातील वाघोटण गावांच्सया समांतर वाघोटण खाडी वाहते ती विजयदुर्ग येथे समुद्राला जाऊन मिळते.नाणार - वाघोटण गावांना वाहतूकीचा दुवा म्हणून प्रवासी वाहतूक होडीतून केली जाते.वाघोटण खाडीवर बारमाही वाहतूक पूल बांधल्यास दोन्ही जिल्ह्यांतील ग्रामस्थांना त्यांच्या विकासासाठी उपयोग तर होईलच पण सिंधुदुर्गातील कणकवली - देवगड तालुक्याकडे प्रवासी अंतर ४० किलोमीटरने कमी होईल.प्रवासातला एक तास वाचेल.रत्नागिरी - राजापूर कडे जाणारी वाहतूक साधने वाढतील.ग्रामीण विकासाला गती मिळेल.कणकवली कडील मार्गावरील मुटाट, पालेकर वाडी,यांचे,पाडगाव,पोंबुर्ले,मालपे,कोरला,फणसगाव, नांदगाव कणकवली तर देवगड कडील मार्गावरील मोंड,पडेल, विजयदुर्ग - मालवण कडे जाणारी वाहतूक सुरळीत होईल.रत्नागिरी मार्गावरील सागवे मार्गे जैतापूर ,नाटे , आडिवरे,पावस राजापूर कडे जाण्यासाठी डोंगर तिठा मार्गे हातिवले तसेच, डोंगर कणेरी मार्गे राजापूर कमी वेळात जास्त प्रवास करता येईल.ग्रामीण अर्थव्यवस्था सुधारेल, व्यापार उदिमात वाढ होईल.राजापूर - देवगड तालुके हापूस आंब्याची पंढरी म्हणून ओळखली जाते.हापूस आंबा व्यापारी बाजारपेठ सुरक्षित आणि वेळेवर पोहचेल.अशा अनेक सुविधा उपलब्ध होतील म्हणून शासनाने नाणार- वाघोटण खाडी वर वाहतूक बांधणे आवश्यक आहे.

**महादेव गोळवसकर**
**मुंबई**
**९८६९४७६२०९**
**mahadeogolvaskar@gmail.com**

# पान १ व ४ वरुन...

### भोकरदनच्या इतिहासात...

प्रत्यक्ष पाहणी करायला आले. पाहणी दरम्यान सर्व सूचना त्यांनी मान्य केल्या आणि लेखी आश्वासन देण्याचे कबुल केले.

सत्ताधाऱ्यांच्या कंपनीला नोटीस हा प्रकार भोकरदन तालुक्यात पहिल्यांदा घडला आहे. पैशाच्या जोरावर आणि राजकीय दबावावर चालणाऱ्या व्यवस्थेला बोरशे गुरुजींच्या उपोषणाने हादरा दिला आहे.

१५ दिवसात काम सुरू न झाल्यास बेमुदत उपोषण अटळ आहे. आता झुकणारी फक्त जनता नाही, आता व्यवस्था झुकेल. असे बोरशे गुरुजी म्हणाले.

### आ. अर्जुनराव खोतकर...

उद्धार केला. त्यांचे जीवनमान उजळून टाकले असे प्रतिपादन केले. छत्रपती शाहू महाराज यांनी विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह, व शैक्षणिक संस्था उभ्या केल्या, व्यापाऱ्यांसाठी व्यापारी पेठा निर्माण केल्या, शेतकऱ्यांसाठी तंत्रज्ञान विकसित केले.

राधा नगरी सारखे धरण बांधून जलसिंचन सुविधा निर्माण केल्या, बहुजनांच्या उद्धारासाठी आरक्षण दिले व आरक्षणातून समता, स्वातंत्र्य, बंधुता, समानता या तत्त्वांचा पुरस्कार केला. छत्रपती शाहू महाराज यांनी बहुजन समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आपले संपूर्ण योगदान दिले. या

कार्यक्रमात आर. टी. इंगळे सर यांनी छत्रपती शाहूंनी शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, राजनैतिक, शेती विषयक, अशा अनेक अनेक विकासात्मक धोरणांचा पुरस्कार करून जनसामान्यांचे जीवनामान अमूलाग्र बदलुन टाकले असे प्रतिपादन केले. तर गौरव इंगळे या छोट्या वक्त्याने शाहू महाराजांच्या जीवन कार्याविषयी ओघवत्या शैलित आपले मत मांडले. कार्यक्रमाला वासुदेव क्षीरसागर, दत्ता उखर्डे, प्रा.गजानन धोटे, दिनकर उखर्डे, नागोराव देशमुख, दीपक देशमुख, अनिकेत गोफणे आदींची उपस्थिती होते.

### सेवानिवृत्तीनंतरही...

पुराव्यांची आणि नियमांच्या पालनाची आवश्यकता असते, हे यातून अधोरेखित होते. यामुळे बँकिंग व्यवस्थेतील पारदर्शकता वाढेल आणि आर्थिक गैरव्यवहारांना आळा बसेल. हा निकाल केवळ बँक कर्मचाऱ्यांसाठीच नव्हे, तर सर्वच सरकारी आणि निम-सरकारी कर्मचाऱ्यांसाठी एक धोक्याची घंटा आहे.''

या प्रकरणात, नसीर अहमद शेख ३० जून २०२१ रोजी सेवानिवृत्त झाले. मात्र, त्यापूर्वीच १७ मार्च २०२१ रोजी बँकेने त्यांना निलंबित करून त्यांच्याविरुद्ध विभागीय चौकशी सुरू केली होती. सेवानिवृत्तीनंतरही ही चौकशी सुरू राहिली आणि चौकशी अधिकाऱ्यांनी बहुतेक आरोप सिद्ध झाल्याचा अहवाल दिला. त्यानंतर, शिस्तपालन प्राधिकरणाने १ एप्रिल २०२२ रोजी त्यांना सेवानिवृत्तीच्या तारखेपासून सेवेतून बडतर्फ करण्याचा आदेश दिला. न्यायालयाने हेही स्पष्ट केले की, न्यायालयीन पुनरावलोकनात न्यायालय चौकशी अधिकाऱ्याच्या भूमिकेत शिरू शकत नाही. जोपर्यंत चौकशी कायद्यानुसार झाली आहे आणि निष्कर्ष पुराव्यावर आधारित आहेत, तोपर्यंत न्यायालय त्यात हस्तक्षेप करणार नाही. या प्रकरणात, आरोपी अधिकाऱ्याला बचावाची पूर्ण संधी देण्यात आली होती आणि त्याच्यावरील आरोप सिद्ध करण्यासाठी पुरेसे कागदोपत्री पुरावे होते, असे खंडपीठाला आढळून आले. (खटल्याचे शीर्षक: जम्मू आणि काश्मीर बँक लि. आणि इतर विरुद्ध नसीर अहमद शेख).

### जनसंपर्क अभियानांतर्गत...

आपल्या समस्या, सूचना आणि अपेक्षा आमदार लोणीकर यांच्यासमोर मांडल्या. नागरिकांशी थेट संवाद साधत त्यांच्या अडचणी समजून घेतल्या या वेळी त्यांनी सामाजिक कार्यकर्ते गणेश शिंदे, प्रतिष्ठित शेतकरी श्याम शिंदे, सुधाकर जईद प्रतिष्ठित व्यापारी, कामगार क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कामगिरी करणारी गोपी ठाकूर, सुवर्णकार रोहित कपाळे, योगशिक्षक गजानन वायाळ, वीज वितरण चे दत्ता सोळंके, शेतीनिष्ठ शेतकरी श्री कदम, इंजिनीयर विशाल यंदे शहाजी राक्षे, डॉ अनुजा बिनगे आदि नागरिकांच्या घरी भेटी दिल्या

यावेळी भाजपा तालुका अध्यक्ष शत्रुघ्न कणसे जिल्हा सरचिटणीस रमेश भापकर भाजपा शहराध्यक्ष प्रवीण सातोनकर गटनेते प्रकाश चव्हाण शहाजी राक्षे संदीप बाहेकर सोनू अग्रवाल सावता काळे कृष्णा आरगडे विजय यादव मुज्जू कायम खाणी मलिक कुरेशी यांची उपस्थिती होती.

### तळा येथे आरक्षणाचे...

संपूर्ण कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन पत्रकार सुरेंद्र शेलार यांनी केले. कार्यक्रमास तालुका महिला अध्यक्षा सुषमा शिंदे, सुमन सकपाळ, मीना नात्के, अनिता सकपाळ, मंदा गायकवाड, तसेच महादेव जगताप, परशुराम गायकवाड, चांगदेव गवाणे यांच्यासह बहुसंख्य विद्यार्थी, पालक व समाजबांधव उपस्थित होते.

कार्यक्रमाचा समारोप यश जवलकर यांनी उपस्थितांचे आभार मानून केला.

### खा. संजय दिना...

न शोभणारी ही भाषा संतापजनक आणि निषेधार्ह आहे. जनतेपर्यंत नेत्यांची भूमिका पोहोचविणे हे पत्रकारांचे कर्तव्य आहे, त्यासाठी प्रश्न विचारणे हा गुन्हा नाही,'' असे मत देशमुख यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात व्यक्त केले.

खासदार संजय दिना पाटील यांनी या पूर्वीही वादग्रस्त वक्तव्ये केली होती हे सर्व ज्ञात आहे.

**राजकीय पडसाद**

या प्रकरणाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गंभीर दखल घेतली आहे. लोकप्रतिनिधींनी माध्यमांशी संवाद साधताना संयम आणि जबाबदारीचे भान ठेवणे आवश्यक असल्याचे मत मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केले. उपमुख्यमंत्री शिंदे यांनी पत्रकारांच्या भावना दुखावण्याचा हेतू नव्हता, असे सांगत प्रकरणाची माहिती घेणार असल्याचे स्पष्ट केले.

लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या पत्रकारांना प्रश्न विचारण्याचा अधिकार आहे आणि त्यांना धमकावण्याचा कोणताही प्रयत्न लोकशाही मूल्यांसाठी घातक असल्याचे मत सर्व स्तरांतून व्यक्त होत आहे.

# पत्रकारांचा अवमान खपवून घेणार नाही – टेंभुर्णी पत्रकार संघ आक्रमक, खासदारांविरोधात पोलीस ठाण्यात निवेदन

**दत्ता देशमुख**

शिवसेनेचे खासदार मा. संजय दिना पाटील यांनी नुकत्याच केलेल्या वाचाळ वक्तव्याचा मराठी पत्रकार संघ, टेंभुर्णी शाखेने तीव्र निषेध नोंदवला असून, त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्याच्या मागणीसाठी टेंभुर्णी पोलीस स्टेशनला निवेदन देण्यात आले.

खासदार संजय दिना पाटील यांनी पत्रकारांबद्दल / समाजातील ** घटकाबद्दल आक्षेपार्ह विधान केल्याचा आरोप पत्रकार संघाने केला आहे. त्यांच्या या विधानामुळे पत्रकार बांधवांच्या भावना दुखावल्या असून समाजात तेढ निर्माण होण्याची शक्यता असल्याचे निवेदनात म्हटले आहे.



लोकप्रतिनिधींनी समाजाला जोडण्याची भूमिका घ्यावी, परंतु खासदार पाटील यांनी केलेले वक्तव्य निषेधार्ह आहे. चौथा स्तंभ म्हणून काम करणाऱ्या पत्रकारांचा अवमान करणे लोकशाहीसाठी घातक आहे,'' असे पत्रकार संघाचे अध्यक्ष/सचिव_ यांनी यावेळी सांगितले.

यावेळी मराठी पत्रकार संघाच्या पदाधिकाऱ्यांनी पोलीस निरीक्षक यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. खासदारांच्या वक्तव्याची सखोल चौकशी करून दोषी आढळल्यास भारतीय दंड संहितेच्या योग्य कलमांन्वये तात्काळ गुन्हा दाखल करावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

आमच्या मागणीची दखल न घेतल्यास पत्रकार संघाच्या वतीने टेंभुर्णी येथे लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल,'' असा इशाराही यावेळी देण्यात आला.

**पोलीसांची भूमिका:**

''निवेदन स्वीकारले आहे. वरिष्ठांच्या मार्गदर्शनानुसार चौकशी करून योग्य ती कार्यवाही करण्यात येईल,'' असे पोलीस निरीक्षकांनी सांगितले.

यावेळी पत्रकार संघाचे निवेदन सपोनि अविनाश राठोड यांनी स्वीकारले. याप्रसंगी अध्यक्ष शेख साहेब, सचिव प्रल्हाद जाधव, जाफराबाद तालुका प्रेस कन्सिल ऑफ महाराष्ट्र चे शेख अशपाक, रावसाहेब अंभोरे, फकरू कुरेशी, प्रताप नवले, सुनील भाले, व्हॉइस मीडिया चे उपाध्यक्ष अशोक पाबळे, बिडी सवडे, बयास चाऊस, सुनील जोशी, शेख नसीम, अल्केश सोमानी, तिडके कॉन्स्टेबल, उपस्थित होते.

# खा. संजय दिना पाटील यांच्या पत्रकारविरोधी वक्तव्याचा तीव्र निषेध व्हॉईस ऑफ मीडिया जालना शाखेकडून कठोर कारवाईची मागणी

**जालना - प्रतिनिधी**

शिवसेना (शिंदे गट) चे खासदार संजय दिना पाटील यांनी पत्रकारांविषयी केलेल्या अवमानास्पद व अयोग्य वक्तव्याचा व्हॉईस ऑफ मीडिया, जालना शाखेच्या वतीने तीव्र निषेध करण्यात आला आहे. संबंधित खासदारावर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्याची मागणी अतिरिक्त पोलीस अधीक्षक विक्रांत साळी यांच्यामार्फत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.



व्हॉईस ऑफ मीडिया, जालना शाखेने जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालय येथे अतिरिक्त पोलीस अधीक्षक विक्रांत साळी यांच्याकडे निवेदन देत आपली बाजू मांडली. या वेळी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक पंकज जाधव यांची उपस्थिती होती. या निवेदनात म्हटले आहे की, पत्रकार हे लोकशाहीचा चौथा स्तंभ असून शासन, प्रशासन आणि जनतेमधील संवादाचे महत्त्वाचे माध्यम आहेत. पत्रकारांना प्रश्न विचारण्याचा, माहिती जाणून घेण्याचा आणि सत्य जनतेसमोर मांडण्याचा घटनादत्त अधिकार आहे. अशा परिस्थितीत लोकप्रतिनिधींनी पत्रकारांविषयी अपमानास्पद भाषा वापरणे हे लोकशाही मूल्यांना आणि मुक्त पत्रकारितेला बाधा पोहोचवणारे आहे.

# संघर्षाशिवाय यश शक्य नाही, सातत्य शिवाय संघर्षाला अर्थ नाही – दीपक खरात

**दत्ता देशमुख**

नुकताच दहावी आणि बारावीचा निकाल लागला आहे. नेहमीप्रमाणे प्रत्येक पालक आपल्या मुलांच्या भविष्याबद्दल चिंतेत असतो. प्रत्येक आई-वडिलांची मनापासून इच्छा असते की आपल्या मुलाने किंवा मुलीने चांगले शिक्षण घेऊन आयुष्यात चांगल्या पदावर पोहोचावे, चांगली नोकरी मिळवावी आणि स्वतः चे उज्ज्वल भविष्य घडवावे.

पण आजचा काळ हा पूर्णपणे तंत्रज्ञानाचा आणि स्पर्धेचा आहे. जग झपाट्याने बदलत आहे. दररोज नवनवीन तंत्रज्ञान बाजारात येत आहे आणि कालपर्यंत महत्त्वाचा असलेला एखादा प्रॉडक्ट किंवा कौशल्य आज कालबाह्य होऊ शकते. त्यामुळे आता फक्त शिक्षण घेणे पुरेसे नाही, तर अद्ययावत, रोजगाराभिमुख आणि कौशल्याधारित शिक्षण घेणे काळाची गरज बनली आहे.

आजपासून २०२२ वर्षांपूर्वी मोबाईल फोन ही सर्वांसाठी सहज उपलब्ध गोष्ट नव्हती. पण आज जवळपास प्रत्येकाच्या हातात स्मार्टफोन आहे. मोबाईलचा उपयोग आपण कसा करतो, यावर त्याचा फायदा-तोटा अवलंबून असतो. तंत्रज्ञान हे साधन आहे; त्याचा योग्य वापर केला तर ते आपले जीवन घडवते, आणि चुकीचा वापर केला तर वेळ, पैसा आणि क्षमता वाया घालवते. हाच नियम शिक्षण आणि करिअरलाही लागू होतो. जसे मोबाईलमध्ये नवनवीन अपडेट्स येत असतात, तसेच शिक्षणातही अपडेट राहणे आवश्यक आहे. नवीन तंत्रज्ञान, नवीन कौशल्ये, नवीन उद्योगक्षेत्रे आणि बदलणारी रोजगारसंधी यांचा अभ्यास करून मुलांनी शिक्षणाची दिशा ठरवली पाहिजे. अन्यथा भविष्यातील स्पर्धेत टिकून राहणे कठीण होईल. आज बँकिंगपासून उद्योगांपर्यंत, शेतीपासून आरोग्यसेवेपर्यंत आणि सरकारी सेवांपासून खाजगी क्षेत्रापर्यंत सर्वच ठिकाणी तंत्रज्ञानाचा वापर वाढत आहे.



पालकांची आणखी एक मोठी चिंता म्हणजे उच्च शिक्षणाचा वाढता खर्च. मोठ्या शहरात जाऊन शिक्षण घेताना रूम भाडे, प्रवास, मोबाईल, शैक्षणिक साहित्य, दैनंदिन खर्च अशा अनेक गोष्टी वाढतात. त्यासोबतच शहरांमध्ये मुलांसमोर चांगल्या आणि वाईट अशा दोन्ही प्रकारच्या गोष्टी उपलब्ध असतात. त्यामुळे शिक्षणाची निवड करताना केवळ नाव किंवा दिखावा न पाहता, मुलांची आवड, त्यांची क्षमता, भविष्यातील संधी, आणि शिक्षणाची प्रत्यक्ष उपयुक्तता यांचा विचार करणे खूप आवश्यक आहे.

आजच्या काळात तांत्रिक शिक्षण हे विद्यार्थ्यांसाठी एक मोठे सामर्थ्य ठरू शकते. अभियांत्रिकी, पॉलिटेक्निक, आयटी, ऑटोमेशन, मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, कॉम्प्युटर, एआय, रोबोटिक्स, डेटा आणि इंडस्ट्रीशी संबंधित क्षेत्रांमध्ये प्रचंड संधी निर्माण होत आहेत. ग्लोबलायझेशनमुळे स्थानिकच नाही तर राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरही विद्यार्थ्यांसाठी रोजगार आणि व्यवसायाच्या संधी उपलब्ध होत आहेत. यासाठी शासनाकडून विविध शिष्यवृत्ती, फी सवलती, प्रवेश योजना आणि कौशल्यविकास उपक्रम उपलब्ध आहेत. पालकांनी आणि विद्यार्थ्यांनी या संधींचा योग्य लाभ घेतला पाहिजे.

मात्र एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजेकोणतेही शिक्षण पूर्ण होताच लगेच मोठे पॅकेज किंवा मोठी नोकरी मिळेलच असे नाही. सुरुवातीला थोडा संघर्ष करावा लागतो, वेळ द्यावा लागतो, अनुभव घ्यावा लागतो, स्वतः ला सिद्ध करावे लागते. पण जर विद्यार्थी प्रामाणिकपणे मेहनत करत राहिला, सातत्य ठेवले, कौशल्य वाढवले आणि चांगले काम केले, तर तो नक्कीच आयुष्यात मोठ्या उंचीवर पोहोचू शकतो.

यश मिळवण्यासाठी चिकाटी, जिद्द, संयम, सहनशीलता, शिस्त आणि संकटांना सामोरे जाण्याची तयारी आवश्यक असते. एका रात्रीत कोणतेही ध्येय साध्य होत नाही. त्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न, योग्य दिशा आणि स्वतःवर विश्वास असणे गरजेचे असते.

आपण जर शेतकरी कुटुंबातून आलो असू, तर ही गोष्ट आपल्याला अधिक चांगली समजते. शेतात चांगले पीक यावे, यासाठी आधी जमिनीची मशागत करावी लागते, योग्य बियाणे निवडावे लागते, पाणी द्यावे लागते, खत द्यावे लागते, कष्ट घ्यावे लागतात आणि योग्य वेळ येईपर्यंत संयम ठेवावा लागतो. तसेच आयुष्याचेही आहे. आपले भविष्य घडवण्यासाठी स्वतःवर मेहनत घ्यावी लागते, संघर्ष करावा लागतो, अपयश पचवावे लागते, पुन्हा उभे राहावे लागते आणि ध्येयाच्या दिशेने सातत्याने चालत राहावे लागते.

**म्हणूनच, प्रिय पालकहो आणि विद्यार्थ्यांनो,**

**दहावी-बारावी नंतरची शिक्षणाची निवड ही केवळ प्रवेशाची प्रक्रिया नाही, तर ती आयुष्याला दिशा देणारा निर्णय आहे.**

**मुलांच्या आवडीचा, त्यांच्या क्षमतेचा, बदलत्या काळाचा आणि भविष्यातील संधींचा विचार करून निर्णय घ्या.**

**योग्य शिक्षण, योग्य मार्गदर्शन, सातत्यपूर्ण मेहनत आणि सकारात्मक दृष्टीकोन असेल, तर यश नक्कीच मिळेल.**

**लक्षात ठेवा**

**''संघर्षाशिवाय यश नाही, आणि सातत्याशिवाय संघर्षाला अर्थ नाही.''**

# बनावट इसार पावतीच्या आधारे जमिनीवर अतिक्रमण करुन ताबा करण्याचा प्रयत्न

## तालुका जालना पोलिस ठाण्यात १० ते १२ जणांविरुध्द गुन्हा दाखल

**जालना - प्रतिनिधी**

शहरातील अंबड रोडवरील जमीनीवर बनावट इसार पावतीच्या आधारे अतिक्रमण करून जमीनीच्या मुळ मालकांना शिवीगाळ, व दमदाटी करत जिवे मारण्याच्या धमक्या दिल्याप्रकरणी तालुका जालना पोलिस ठाण्यात दहा ते बारा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी जमीन मालक दिनकर देशमुख यांनी तालुका जालना पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, सर्व्हे नंबर ४७७ मधील सहा एक्कर वीस गूंठे शेतजमीन दिनकर देशमुख, सुरेंद्रकुमार मेहरा आणि रामराव खडके यांनी किसन बरवार यांच्याकडुन सन १९८१ साली विकत घेवुन सन १९९७ साली जिल्हाधिका-यांच्या रितसर परवानगी नंतर प्लॉट पाडुन वाटुन घेतले. सदर प्लॉटचे पी. आर.कार्ड त्यांच्याच मालकीचे आहेत. तथापी काही दिवसांपुर्वी किसन बरवार यांचा नातु मनोज मदारे (बरवार) व त्यांच्या भावाने सदर गटात जमीन असल्याचे सांगुन अॅड. ब्रम्हानंद चव्हाण यांच्या नांवे बनावट खोटी इसारपावती तयार करून आमच्या प्लॉटमध्ये सिमेंटचे पोल व तार कंपाऊंण्ड करुन प्लॉट बळकवण्याचा प्रयत्न करत होते. तसेच दि.१६ जुन रोजी दिनकर देशमुख आणि रामराव खडके यांच्या ताब्यात व मालकी हक्कात असलेल्या नगर भूमापन क्रमांक ११३९७/७८, ११३९८/७९, ८०,९५,९२ ते १०२ या प्लॉटवर अतिक्रमण करण्याच्या इराद्याने सिमेंटचे खांब उभे करून तार कंपाऊंड करत असतांना प्लॉट मालक त्यांना समजावण्यास गेले असता मनोज मदारे, त्याचा भाऊ व ब्रम्हानंद चव्हाण, सिध्दार्थ चव्हाण व इतर दहा ते बारा गुंड प्रवृत्तीच्या लोकांनी दमदाटी व शिवीगाळ करुन जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या, अॅट्रॉसिटी कायद्यानुसार गुन्हे दाखल करण्याच्या धमक्या देवुन धाकदपटशाही करत दिनकर देशमुख व रामराव खडके यांना जबरदस्तीने हाकलून लावण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी देशमुख यांच्या फिर्यादीवरुन तालुका पोलीस ठाण्यात मनोज मदारे (बरवार) त्याचा भाऊ व सिध्दार्थ चव्हाण, ब्रम्हानंद यांच्यासह दहा ते बारा जणाविरुध्द तालुका जालना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# टेंभुर्णी येथे विश्व हिंदू परिषद व राष्ट्रीय बजरंग दल यांचा आठवा वर्धापन दिन साजरा

**दत्ता देशमुख**

टेंभुर्णीत आंतरराष्ट्रीय हिंदू परिषद व राष्ट्रीय बजरंग दलाचा ८ वा वर्धापन दिन उत्साहात; गौरीशंकर आश्रमात १०८ वृक्षारोपण आणि गोपूजनाने पर्यावरण अन् संस्कृती रक्षणाचा संदेशविशेष वृत्तसेवाटेंभुर्णी:टेंभुर्णी शहरात आंतरराष्ट्रीय हिंदू परिषद आणि राष्ट्रीय बजरंग दलाच्या ८ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून विविध सामाजिक व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. स्थानिक गौरीशंकर आश्रम येथे पार पडलेल्या या सोहळ्यात संघटनांच्या वतीने संस्कृती रक्षा आणि पर्यावरण संवर्धनाचा मोठा संदेश देण्यात आला. या निमित्ताने आयोजित उपक्रमांना टेंभुर्णी परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.गोपूजन आणि गोसेवेने कार्यक्रमाची सुरुवातवर्धापन दिनाचे औचित्य साधून गौरीशंकर आश्रम परिसरात सर्वप्रथम हिंदू संस्कृतीचे प्रतीक असलेल्या गोमातेचे विधिवत पूजन करण्यात आले. यानंतर उपस्थित सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी एकत्रित येत आश्रमातील गोवंशाची सेवा केली आणि त्यांना चारा-पाणी दिले.



आजच्या आधुनिक काळात गोवंश रक्षण आणि गोसेवा काळाची गरज असल्याचे मत याप्रसंगी पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केले. पर्यावरण रक्षणासाठी १०८ वृक्षांचे रोपणसध्याच्या बदलत्या हवामानाचा आणि वाढत्या प्रदूषणाचा विचार करून या वर्धापन दिनाचे मुख्य आकर्षण भव्य वृक्षारोपण मोहीम ठरली. आश्रमाच्या परिसरात संघटनांच्या वतीने तब्बल १०८ औषधी आणि सावली देणाऱ्या वृक्षांची लागवड करण्यात आली. केवळ वृक्षारोपण न करता या सर्व झाडांचे पूर्णपणे संगोपन आणि संवर्धन करण्याचा संकल्पही सर्व कार्यकर्त्यांनी सामूहिकपणे केला.

पदाधिकाऱ्यांची मोठी उपस्थितीया संपूर्ण सोहळ्यासाठी राष्ट्रीय बजरंग दल आणि आंतरराष्ट्रीय हिंदू परिषदेचे टेंभुर्णी शहर व तालुक्यातील सर्व प्रमुख पदाधिकारी, निष्ठावंत कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यकर्त्यांच्या अभूतपूर्व गर्दीमुळे आणि शिस्तीमुळे हा सोहळा अत्यंत उत्साहात आणि यशस्वीरित्या पार पडला.

# ६४८०० रुपयाची दारू टेंभुर्णी पोलिसांनी पकडली

**दत्ता देशमुख**

टेंभुर्णी पोलीस स्टेशन तालुका जाफराबाद जिल्हा जालना, येथील पोलीस स्टेशनच्या सपोनि अविनाश राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक खराडे साहेब यांनी ६४ हजार आठशे रुपयाची दारू पकडली. अवैध धंद्याविरुद्ध सध्या जालना जिल्ह्यामध्ये मोहीम सुरू आहे. पोलीस स्टेशनची सुद्धा या अवैध धंद्याविरुद्ध मोहीम सुरू आहे. दिनांक २६ जून रोजी पोलीस उपनिरीक्षक खार्डे यांनी त्यालाच कॉन्स्टेबल कायंदे, पोलीस कॉन्स्टेबल सागर शिवरकर, होमगार्ड आढावे, होमगार्ड कुमकर, हे पेट्रोलिंग वर असताना गुप्त खबऱ्या मार्फत माहिती मिळाली तेव्हा त्यांनी नळविहारा शिवारामध्ये जाफराबाद येणाऱ्या होंडा शाइन एम एच २१ बीबी



७५४७ लाल रंगाच्या गाडीमध्ये हवेत दारू विक्रीसाठी जात आहे. पेट्रोलिंग पथकाने दबा धरून बसल्यानंतर सदर होंडा शाईन गाडी आल्यानंतर त्यास विचारपूस केल्यानंतर परमेश्वर कुंडलिकराव जाधव वर्ष ५६ राहणार हिवरा काबली याच्याजवळ थैली लीमध्ये दारूच्या बाटल्या सापडल्या गाडीच्या डीककी मध्ये सुद्धा वाटल्यास आपल्या सापडल्या. त्याच्याजवळ १८० एम एल च्या देशी दारूच्या २४ बाटल्या आढळून आल्या त्याचे किंमत २४ ००रुपये, ९० एम एल च्या देशी दारूच्या ४८ बाटल्या याची किंमत २४०० रुपये, होंडा शाईन कंपनीची ६० हजार रुपये किमतीची मोटार सायकल ताब्यात घेण्यात आली.

पावसात हजार आठशे रुपये किमतीचा माल जप्त करण्यात आला ही मोठी कारवाई करण्यात आल्यामुळे टेंभुर्णी पोलिसांचे सर्वत्र कौतुक होत आहे. आमचा समक्ष पंचनामा करून हे सर्व मुद्देमाल जप्त करून ताब्यात घेण्यात आला. देशी दारूची चोरटी वाहतूक करून स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी हे कृत्य करत असताना टेंभुर्णी पोलीस स्टेशन ने महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ नाहीतर नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# आमदार सिरसाट यांच्या विजयाचा टेंभुर्णीत जल्लोष

## माळी महासंघाकडून मिठाई वाटप करून आनंदोत्सव साजरा

**दत्ता देशमुख**

छत्रपती संभाजीनगर आणि जालना स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील भाजपचे विजयी उमेदवार सुहास सिरसाट यांच्या निवडीनिमित्त टेंभुर्णी येथे भाजप व माळी महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी मिठाई वाटप व चहापानाचा कार्यक्रम आयोजित केला होता.

माळी समाजातील फुलब्रीचे माजी नगराध्यक्ष तथा भाजपचे जिल्हाध्यक्ष असलेल्या सुहास सिरसाट यांना उमेदवारी देऊन एका शेतकऱ्याच्या मुलाला भाजपने न्याय मिळवून दिला आहे. सिरसाट यांच्या रूपाने मराठवाड्यातील ओबीसी माळी समाजाला हक्काचे नेतृत्व मिळाले असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

या कार्यक्रमाला माळी महासंघाचे अध्यक्ष रावसाहेब अंभोरे, भोकरदनचे आमदार संतोष दानवे यांचे खाजगी सहाय्यक सचिव उध्दव पाटील दुणगहू, भाजयुमोचे जाफ्राबाद तालुका अध्यक्ष विजय परिहार, युवानेते ज्ञानेश्वर माऊली होती. पवार, खानापूर नागेश्वर संस्थानाचे मठाधिपती लक्ष्मण महाराज शिंदे यांच्यासह माळी समाजातील पदाधिकारी उपस्थित होते.

तसेच यावेळी शंकरराव मुळे, जगन्नाथ जमधडे, राजू मगर, भगवान घोडके आदी समाजबांधवांचीही उपस्थिती.

# तालुका मराठी पत्रकार संघ आक्रमक, संजय दिना पाटील त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची निवेदन

**दत्ता देशमुख**

जाफराबाद तालुका मराठी पत्रकार संघाच्या वतीने जाफराबाद पोलीस स्टेशन येथे निवेदन देण्यात आले. संजय दिना पाटील शिवसेना खासदाराणे पत्रकारांना धमकी दिल्याबद्दल त्यांच्यावर गुन्हा दाखल करावा असे निवेदन देण्यात आले. निवेदनावर जाफराबाद तालुका पत्रक यांच्या कार्यकारिणीची सह्या आहे.



यावेळी पत्रकार संघाच्या वतीने पत्रकारांवर दडपशाही आणि धमक्या देण्याची सत्र त्यांच्यावर गुन्हे दाखल करणे यावे अशी निवेदने सर्वच ठिकाणी देण्यात येत आहे. प्रकार हा लोकशाहीचा चौथा स्तंभ असून पत्रकारावर दडपशाही, कुणाच्या धमक्या, मिळत असल्यामुळे संरक्षण आणि स्वातंत्र्याचा अशा लोकांना गुन्हे दाखल करणे हे योग्य असल्याचे पत्रकारांच्या वतीने स्पष्ट करण्यात आले. संघाच्या वतीने दिलेले निवेदन हे राज्याचे गृहमंत्री, जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक व तहसीलदार यांना देण्यात आले आहे. यावेळी तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष मुकेश भारद्वाज, तालुका पत्रकार संघाचे उपाध्यक्ष विष्णू मगर, बाळासाहेब गवळी, प्रल्हाद लोणकर, शेख कदीर, शेख अजीम, चेतन बायस, विनोद फदाट,हरी भालके, विशाल वाकडे, संतोष शेळके, मंगलसिंग भारद्वाज, आधी उपस्थित होते.

# सेवानिवृत्तीनंतरही विभागीय चौकशी सुरू ठेवता येते, बडतर्फीचा अधिकार कायम

**जालना - प्रनीतिर्ति**

सेवेत असताना बँक कर्मचाऱ्यावर सुरू झालेली शिस्तभंगाची कारवाई त्याच्या सेवानिवृत्तीनंतरही कायदेशीररित्या सुरू ठेवली जाऊ शकते आणि जर सेवा नियमांमध्ये तशी तरतूद असेल, तर ती कारवाई बडतर्फीच्या आदेशाने समाप्त होऊ शकते, असा महत्त्वपूर्ण निकाल जम्मू-काश्मीर आणि लडाख उच्च न्यायालयाने दिला आहे. यासोबतच, शिस्तभंगाच्या प्रकरणांमध्ये न्यायालयीन पुनरावलोकनाची व्याप्ती ही केवळ निर्णय प्रक्रिया योग्य होती की नाही हे तपासण्यापुरती मर्यादित आहे; चौकशी अधिकाऱ्यांनी नोंदवलेल्या पुराव्यांचे किंवा निष्कर्षांचे पुनर्मूल्यांकन करणे हे न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात येत नाही, असेही न्यायालयाने पुन्हा एकदा स्पष्ट केले. जम्मू आणि काश्मीर बँकेने दाखल केलेल्या एका अपिलावर सुनावणी करताना न्यायमूर्ती संजीव कुमार आणि न्यायमूर्ती संजय परिहार यांच्या खंडपीठाने हा निकाल दिला. बँकेचे माजी शाखा प्रमुख नसीर अहमद शेख यांची बडतर्फी रद्द करणारा आणि त्यांचे सेवा लाभ पूर्ववत करण्याचा एकल न्यायाधीशांचा निर्णय खंडपीठाने रद्द केला. शेख यांच्यावर बारामुल्ला आणि रंगरेथ शाखांमध्ये कार्यरत असताना आपल्या अधिकारांपलीकडे जाऊन आणि बँकिंग नियमांचे उल्लंघन करून तात्पुरते ओव्हरड्राफ्ट मंजूर केल्याचा आरोप होता.

उच्च न्यायालयाने आपल्या निकालात स्पष्टपणे नमूद केले की, ''एखाद्या अधिकाऱ्यावर किंवा कर्मचाऱ्यावर तो सेवानिवृत्त होण्यापूर्वी सुरू झालेली विभागीय चौकशी, जर विद्यमान सेवा नियम/विनियम परवानगी देत असतील, तर ती त्याच्या सेवानिवृत्तीनंतरही सुरू ठेवली जाऊ शकते आणि तार्किक निष्कर्षापर्यंत पोहोचवली जाऊ शकते.'' या प्रकरणात, बँकेच्या अधिकारी सेवा नियमावली, २००० च्या नियम २५९ नुसार, सेवानिवृत्तीनंतरही शिस्तभंगाची कारवाई सुरू ठेवण्याची आणि बडतर्फीसह कोणतीही शिक्षा देण्याची स्पष्ट परवानगी बँकेला आहे.

या निकालावर आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना, **नोटरी असोसिएशन, जालनाचे अध्यक्ष, ॲड. महेश धन्नावत** म्हणाले, ''उच्च न्यायालयाचा हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा असून तो सार्वजनिक क्षेत्रातील, विशेषतः बँकिंग क्षेत्रातील उत्तरदायित्व आणि शिस्त अधिक मजबूत करणारा आहे. अनेकदा कर्मचारी सेवानिवृत्तीच्या जवळ असताना केलेल्या गैरप्रकारांमधून सुटून जातील, अशी एक भावना असते. मात्र, या निकालाने स्पष्ट केले आहे की, सेवानिवृत्ती म्हणजे शिस्तभंगाच्या कारवाईतून सुटका नव्हे. जर सेवा नियमांमध्ये तरतूद असेल, तर चौकशी पूर्ण करून कठोर कारवाई केली जाऊ शकते.''

ॲड. धन्नावत पुढे म्हणाले, ''या निकालामुळे सार्वजनिक निधीची हाताळणी करणाऱ्या अधिकाऱ्यांवर एक प्रकारचा वचक निर्माण होईल. वरिष्ठांच्या तोंडी सूचनेनुसार काम केले हा बचाव आता पुरेसा नाही. प्रत्येक आर्थिक निर्णयासाठी लेखी

(पान २ वर)

# शाहू महाराज जयंती समता दिन म्हणून साजरा



**दत्ता देशमुख**

तक्षशिला बौद्ध धम्म बहुद्देशीय सेवाभावी संस्था समर्थ नगर जालना आणि संविधान जागर अभियान यांच्या संयुक्त वतीने येथे लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती ही समता दिन म्हणून साजरी करण्यात आली. यावेळी आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यान मध्ये कामगार नेते कॉम्रेड अण्णा सावंत यांनी छत्रपती शाहू महाराज यांच्या कार्याविषयी अभ्यासपूर्ण माहिती देऊन सर्व सामाजबांधवना मार्गदर्शन केले.शाहू महाराज यांनी सर्व मागासवर्गीय विद्यार्थी साठी शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून दिल्या आणि अस्पृश्यांसाठी कोल्हापुरात ५०% आरक्षण दिले.सर्व धर्मभाव समान माननारा राजा असे अण्णा सावंत यांनी सांगितले.यानंतर प्राचार्य डॉ राजकुमार म्हस्के यांनीही छत्रपती शाहू महाराज यांच्या कार्याविषयी माहिती दिली.कार्यक्रमात समता दिन साजरा करताना तेथे *समतेची चहा देऊन ममतेची वैचारिक ऊब व्याखानाद्वारे दिल्याबद्दल महेंद्र साळवे यांनी व्याख्याते अण्णा सावंत,प्राचार्य डॉ. म्हस्के आणि सर्व उपस्थितांचे आभार मानले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री निहाळ सर यांनी केले. यावेळी कार्यक्रमाला मिर्झा अफसर बेग (पीस फाऊंडेशन)छाया साळवे,धनश्री पगारे, सुप्रिया बगळे,सुमनबाई वाघमारे प्रा.कांबळे सर, प्रा. गरड,अशोक गंगावणे, चंद्रकांत वाघमारे, प्रा.किशोर साळवे, प्रकाश जायेभाये,आकाश शरणागत, विशाल वाघमारे तक्षशिला बौद्ध विहाराचे अध्यक्ष भिकाजी साळवे यांची उपस्थिती होती.

# जनसंपर्क अभियानांतर्गत आमदार बबनराव लोणीकर यांचा परतूर शहरात घराघरांत संपर्क

## विविध समाजघटकांतील नागरिकांच्या भेटी घेऊन जाणून घेतल्या समस्या

**परतूर - प्रतिनिधी**

माजी मंत्री तथा आमदार बबनराव लोणीकर यांनी जनसंपर्क अभियानांतर्गत परतूर शहरातील विविध भागांना भेट देत अनेक नागरिकांच्या घरी प्रत्यक्ष जाऊन संवाद साधला. शहरातील विविध जाती, धर्म आणि पंथातील नागरिकांच्या निवासस्थानी भेटी देत त्यांनी त्यांच्या कुटुंबीयांची आत्मीयतेने विचारपूस केली तसेच त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होत नागरिकांशी जिव्हाळ्याचा संवाद साधला.



यावेळी आमदार लोणीकर यांनी प्रत्येक भागातील नागरिकांकडून स्थानिक समस्या, विकासकामांची आवश्यकता आणि मूलभूत सुविधांबाबत सविस्तर माहिती जाणून घेतली. पिण्याचे पाणी, रस्ते, गटारी, स्वच्छता, वीज, आरोग्य आणि इतर नागरी सुविधांबाबत नागरिकांनी मांडलेल्या अडचणी त्यांनी शांतपणे ऐकून घेतल्या.

''प्रत्येक नागरिकाच्या दारापर्यंत पोहोचून त्यांच्या समस्या जाणून घेणे आणि त्या सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे हेच माझे कर्तव्य आहे. ज्या भागात ज्या सुविधा अपुऱ्या आहेत, त्या उपलब्ध करून देण्यासाठी शासनस्तरावर आवश्यक तो पाठपुरावा करून विकासकामांना गती दिली जाईल,'' असे आश्वासन आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी दिले.

या जनसंपर्क अभियानात शहरातील विविध समाजघटकांतील नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. नागरिकांनी

(पान २ वर)

# स्मार्ट कार्ड नाही तर एसटी सवलतीलाही रामराम..!

## १ ऑगस्टपासून एनसीएमसी कार्ड सक्तीचे; वृद्ध,विद्यार्थी, दिव्यांगांसह सर्व सवलतीधारकांना बसणार फटका

**भोकरदन - प्रतिनिधी**

राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) बसमधून प्रवास करणाऱ्या विविध सवलतधारक प्रवाशांसाठी आता नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड () अनिवार्य करण्यात आले आहे. ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी, दिव्यांग, पत्रकार, खेळाडू यांसह एसटीकडून सवलत घेणाऱ्या सर्व प्रवाशांनी १ ऑगस्ट २०२६ पूर्वी एनसीएमसी स्मार्ट कार्ड काढणे बंधनकारक आहे.अन्यथा १ ऑगस्टपासून कोणतीही सवलत मिळणार नसून थेट पूर्ण तिकीट भाडे आकारले जाणार आहे.केंद्र सरकारच्या वन नेशन, वन कार्ड संकल्पनेअंतर्गत एसटी महामंडळाने सवलतीच्या सर्व योजना एनसीएमसी कार्डशी जोडल्या आहेत. जालना विभागात या कार्डाचे वितरण व नोंदणी सध्या युद्धपातळीवर सुरू असून, शेवटच्या क्षणी होणारी गर्दी टाळण्यासाठी लाभार्थ्यांनी तातडीने नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.




**कार्ड नाही... तर सवलतही नाही!**

१ ऑगस्ट २०२६ नंतर एनसीएमसी कार्ड नसलेल्या कोणत्याही सवलतधारकाला एसटीच्या तिकिटावर सवलत मिळणार नाही. वृद्ध असो की विद्यार्थी, सर्वांनाच पूर्ण भाडे भरावे लागणार आहे.

# माहोरा येथील केंद्रीय प्राथमिक शाळेत छत्रपती शाहू महाराज यांची जयंती



**दत्ता देशमुख**

जाफ्राबाद तालुक्यातील माहोरा येथील केंद्रीय प्राथमिक शाळेत छत्रपती शाहू महाराज यांची
जयंती उत्साहात साजी करण्यात आली. प्रारंभी शालेय समितीचे संतोष गौरकर, बाळासाहेब गव्हले, रामू शेळके, मुख्याध्यापक अनिल गवई, जेष्ठ शिक्षक संतोष लोखंडे, जेष्ठ शिक्षिका अर्चना भांडेकर, अंकुशराव गाढे यांच्या हस्ते शाहू महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक अनिल गवई म्हणाले, छत्रपती शाहू महाराज यांचे विचार व आचार शुद्ध होते. ते जनतेसाठी सतत जनकल्याणाचेच निर्णय घेणारे राजे होते. कार्यक्रमाचे आभार शिक्षक संतोष लोखंडे यांनी मानले. छत्रपती शाहू महाराजांच्या सामाजिक कार्याचा व पुरोगामी विचारांचा यावेळी गौरव करण्यात आला.

# तळा येथे आरक्षणाचे जनक राजर्षी शाहू महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी



**बोरघर - विश्वास गायकवाड**

दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया, तालुका शाखा तळा व बौद्धजन पंचायत समिती तालुका शाखा तळा यांच्या संयुक्त विद्यमाने आरक्षणाचे जनक राजर्षी शाहू महाराज यांची १५२ वी जयंती अनंत मोरे यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. यावेळी सामाजिक बांधिलकी जपत ॲड. प्रबुद्ध माळी, ॲड. सुशांत जगताप व आदित्य शिंदे यांच्या पुढाकारातून इयत्ता १ ली ते १० वी तसेच पदवीधर विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे मोफत वाटप करण्यात आले. या उपक्रमाचे उपस्थितांनी विशेष कौतुक केले. कार्यक्रमाची सुरुवात महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रामदास शिंदे यांनी केले. सूत्रपठण विशाखा शिंदे, गणपत जगताप व भास्कर गवाणे यांनी केले.

याप्रसंगी ॲड. सुशांत जगताप, ॲड. प्रबुद्ध माळी, ॲड. सचिन भोसले, ज्येष्ठ मार्गदर्शक प्रकाश माळी, पल्लवी सकपाळ यांच्यासह अन्य मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना राजर्षी शाहू महाराज यांच्या कार्याचा व सामाजिक न्यायाच्या विचारांचा गौरवपूर्ण आढावा घेतला.

(पान २ वर)

# सेवलीत राजश्री छत्रपती शाहू महाराज यांची जयंती वंचित बहुजन आघाडी कडून उत्साहात साजरी



**जालना - प्रतिनिधी**

सामाजिक न्याय, समता आणि बहुजन कल्याणाचे प्रणेते राजश्री छत्रपती शाहू महाराज यांची जयंती जालना तालुक्यातील सेवली येथे वंचित बहुजन आघाडी कडून उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा उपाध्यक्ष दिपक डोके यांच्या हस्ते राजश्री छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर उपस्थितांनी शाहू महाराजांच्या सामाजिक कार्याचा व समतावादी विचारांचा जागर करून त्यांच्या कार्याला अभिवादन केले.

कार्यक्रमाला वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा उपाध्यक्ष दिपक डोके, अरुण काकडे शत्रुघ्न कोळी, निवृत्ती डोके, गणेश उबाळे, दिलीप मगर गौतम मगर, अर्जुन घुगे सुनील खाडे, विलास काळे, बाबासाहेब खाडे, विजय काळे,लखन डोके, दिलीप खाडे, सुरेश पवार, रमेश पवार दिलीप बिबे, लक्ष्मण पवार यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात उपस्थितांनी राजश्री छत्रपती शाहू महाराज यांच्या सामाजिक परिवर्तनाच्या कार्याचा आदर्श समाजाने कायम जपला पाहिजे, असा संदेश देत त्यांच्या विचारांचा प्रसार करण्याचा निर्धार व्यक्त केला.

# टेंभुर्णी येथे महेश नवमी उत्सवात साजरी

**दत्ता देशमुख**

टेंभुर्णी तालुका जाफराबाद जिल्हा जालना येथील माहेश्वरी समाजाच्या वतीने महत्वाची असलेली महेश नवमी मोठ्या आनंदाने उत्सवात साजरी करण्यात आली.या वेळी सकाळी येथील महादेव मंदिर मध्ये डॉ प्रशांत काबरा यांनी सपत्नीक पूजा अभिषेक करून आरती करण्यात आली. या वेळी समाजाचे महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दुसऱ्या सत्रात येथील इ बी के विद्यालय येथे सगळे नियोजित कार्यक्रम पार पडले.या वेळी महिला मंडळ कडून महेश वंदना करून देव महादेव यांची पूजा आरती करण्यात आली. टेंभुर्णी हे गावं तालुक्यातील सर्वात मोठे गाव असल्याने येथे



माहेश्वरी समाज मोठ्या प्रमाणात असल्याने जाफ्राबाद माहोरा व तालुक्यातील सर्व समाज बांधव येथे एकत्र आल्याने कार्यक्रम मोठ्या प्रमाणात करण्यात आला.या छोट्या खानी कार्यक्रमाचे सूत्र संचलन कल्पेश सोमाणी यांनी केले तर या वेळी संतोष काबरा माझी तालुका अध्यक्ष अलकेश सोमाणी व प्रशांत काबरा यांची समयोचित भाषणे झाली.या वेळी समाजातील ज्येष्ठ सर्व श्री घनश्यामदास काबरा, नंदलाल काबरा,पुरुषोत्तम धूत, गणेशलाल सोमाणी,यांच्या सह आदी मान्यवर महिला पुरुष बाळ गोपाळ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

समाजातील होतकरू विद्यार्थी चांगल्या मार्कने पास झालेल्या विद्यार्थी विद्यार्थिनी यांच्या परिवार जणांचा या वेळी सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

# खा. संजय दिना पाटील यांच्या पत्रकारांवरील आक्षेपार्ह विधानाचा पत्रकार संघटनांकडून तीव्र निषेध

## माणगाव तालुका प्रेस क्लबच्या माध्यमातून माणगाव पोलीस ठाण्यात निषेधात्मक निवेदन

**बोरघर - विश्वास गायकवाड**

ईशान्य मुंबईचे खासदार संजय दिना पाटील यांनी पत्रकारांना उद्देशून केलेल्या आक्षेपार्ह आणि धमकीवजा वक्तव्याचा राज्यभरातील पत्रकार संघटनांनी तीव्र शब्दांत निषेध नोंदवला आहे.

उद्धव ठाकरे गटातून शिंदे गटात प्रवेश केलेल्या खासदार संजय दिना पाटील यांच्या घरी राजकीय भूमिकेवर प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी गेलेल्या पत्रकारांवर त्यांनी संताप व्यक्त केला. यावेळी त्यांनी ''तुम्ही परत इकडे आलात तर मी तुम्हाला मारून पाठवेन'' आणि '' मध्ये घुसण्याचा प्रयत्न करू नका'' अशा शब्दांत शिवीगाळ व धमकी दिल्याचा व्हिडिओ समोर आला आहे. पोलिसांच्या उपस्थितीतच हा प्रकार घडल्याने प्रकरण अधिक गंभीर बनले आहे.



या पार्श्वभूमीवर माणगाव तालुका प्रेस क्लबचे मुख्य संघटक पद्माकर उभारे, कार्याध्यक्ष गौतम जाधव, सल्लागार उत्तम तांबे, सल्लागार विनोद सापळे, अध्यक्ष संतोष सुतार, उपाध्यक्ष विश्वास गायकवाड, सुनील राजभर यांनी माणगाव पोलीस ठाण्यात खासदार संजय दिना पाटील यांच्या आक्षेपार्ह वक्तव्याचा जाहीर निषेध व्यक्त करून निषेधार्थ लेखी निवेदन दिले.

**पत्रकार संघटनांचा आक्रमक पवित्रा**

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद, पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती आणि डिजिटल मिडिया परिषदेने या घटनेचा निषेध केला आहे. परिषदेचे एस. एम. देशमुख यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे संजय दिना पाटील यांच्यावर कडक कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच खासदारांना असलेली वाय दर्जाची सुरक्षा व्यवस्था काढून घ्यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. ''खासदाराला

(पान २ वर)

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.